Kisan Shikshan Prasarak Mandal Hadolti
KARMAYOGI TULSHIRAR PAWAR MAHAVIDHYALAYA HADOLTI,
TA.AHEMDAPUR DIST.LATUR
B.A.INTERNAL EXAM. 2021-22
Class:-B.A.S.Y. Sem.IV Test- I Subject- PALI Time -30Min Mark 10
Name Of Paper मज्झिमनिकायपाली व खुद्दक पाठ (Optional) Paper No: VII

प्रशन .1 ला खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा .

मंगलसुत्त विषयी सविस्तर माहिती लिहा

किंवा

आर्य अष्टांगिकमार्ग विषयी सविस्तर माहिती लिहा

Kisan Shikshan Prasarak Mandal Hadolti
KARMAYOGI TULSHIRAR PAWAR MAHAVIDHYALAYA HADOLTI,
TA.AHEMDAPUR DIST.LATUR
B.A.INTERNAL EXAM. 2021-22
Class:-B.A.S.Y. Sem.IV Test- I Subject- PALI Time -30Min Mark 10
Name Of Paper :पाली व्याकरण (optional) Paper No: VIII

प्रशन .1 ला खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा .

वर्तमान काळ व त्याचे प्रत्यय उदा. स्पष्ट करा.

किंवा

समासाचे प्रकार सांगून 'कर्मधारय ' समास स्पष्ट करा .

Scanned with OKEN Scanner

नाव :- खजोपवार रचिता राजेश्वर
वर्ग :- B.A.S.Y -2021-2022
सेमिस्टर - IV
विषय - मज्झिम निकाय पाली व खुद्दकपाठ
Roll. No. AN240420

9/10

आर्य अष्टांगिक मार्ग

भगवान बुद्धाला वैशाख पौर्णिमेला बुद्धगया येथे बोधी वृक्षाखाली ज्ञान प्राप्त झाले. आपल्याला प्राप्त झालेले ज्ञान कोणाला द्यावे हा त्यांच्यापुढे प्रश्न पडला होता. भगवान बुद्धांनी शोधून काढलेली धम्म कोण जाणू शकेल? तेव्हा त्यांनी अवलोकन केले की, आलारकलाम आणि उद्दकरामपुत्त या आपल्या गुरूंना उपदेश द्यावा. ते मरण पावल्याचे दिसून आले त्यानंतर त्यांनी आपल्या सोबत असलेल्या पाच सोबत्यांना आपल्या धम्माचा उपदेश द्यावा असा विचार केला ते ऋषिपत्तन येथे राहत होते. तेथे जाऊन भगवान बुद्धांनी आपल्या धम्माचा उपदेश त्यांना सांगितला भगवान बुद्धांनी स्थापन केलेला धम्म ईश्वर मानत नाहीत. आत्मा, परमात्मा, मानत नाहीत. ग्रंथ प्रामाण्य याला स्थान नाही येथे दैववाद नसून प्रयत्नवाद आहे. इतर धर्मात जगाचा कर्ता करविता ईश्वरावर सोपविला आहे. परंतु बौद्ध धर्म ईश्वर मानत नसल्यामुळे येथे मनुष्याच्या कर्तव्यावर अवलंबून आहे. भगवान बुद्धांनी सहा वर्षे तपश्चर्या करून चार आर्यसत्ये शोधून काढले. जगामध्ये दुःख, दुःखसमुदाय, दुःखनिरोध आणि दुःखनिरोधगामिनीपटिपदा म्हणजे दुःख नष्ट करण्याचा मार्ग होय. यालाच आर्य आष्टांगिक मार्ग असे म्हणतात. तो खालीलप्रमाणे आहे.

सम्यक्दृष्टी :-

सम्यक्दृष्टी म्हणजे योग्य दृष्टी होय. तर्कशुद्ध, न्यायशुद्ध, विचार अशा सम्यक्दृष्टीमुळे धर्मशास्त्रांच्या पावित्र्याविषयी आणि विधी व वृत्ते यांच्या उपयुक्तविषयी अविश्वास निर्माण करतो. सर्व अंधश्रद्धा व अमानवी गोष्टी यांचा त्याग करणे सम्यक्दृष्टी शिकवते. जगामध्ये दुःख आहे व त्याचे निरसन करण्याचा मार्ग या विषयीचे अज्ञान म्हणजे अविद्या होय. मनुष्याचे मन हेच ज्ञान प्राप्तीचे एकमेव साधन होय. मन हेच बंधन व मुक्तता यांचे कारण आहे. असा विश्वास सम्यक्दृष्टी निर्माण करते. सम्यक्दृष्टीची प्राप्ती होण्यासाठी मन व विचार स्वतंत्र पूर्वग्रहयुक्त असावे लागते. सम्यक्दृष्टी अष्टांगिक मार्गातील पहिले अंग आहे. अविद्येचा नाश करणे हा सम्यक्दृष्टीचा हेतू आहे. माणसाने कर्मकांडाच्या विधींना व्यर्थ समजणे आणि शास्त्रांच्या पावित्र्यावरील मिथ्या विश्वास सोडून देणे अद्भुत कल्पनांचा त्याग करणे, निसर्ग नियमांच्या विरुद्ध कोणतेही गोष्ट होऊ शकत नाही हे समजणे म्हणजे सम्यक्दृष्टी होय.

सम्यक्संकल्प :-

सम्यक्संकल्प म्हणजे योग्य विचार करणे होय. प्रत्येक माणसाला काही ध्येय, आकांक्षा, महत्वाकांक्षा असतात ही उदात्त आणि प्रशंसनीय असले पाहिजे. निन्द्य आणि अयोग्य नसली पाहिजे. नेहमी मनुष्याने शांत राहण्याचा निश्चय केला पाहिजे. दुसऱ्याला दुःख न देणे, हिंसा न करणे आपल्या आकांक्षा आणि हे थोर आणि पवित्र असले पाहिजेत. यासाठी पंचशीलांचे पालन करणे आवश्यक आहे. सम्यक्संकल्पामुळे कर्त्यांच्या पदरी निराशा येत नाही. त्याची जाणीव झाल्यास समाधान वाटते. त्यामुळे मानवी जीवन कल्याणकारी होते.

सम्यक्वाचा :-

सम्यक्वाचा म्हणजे योग्य वाणी होय. मनुष्याने सत्य तेच बोलावे असत्य बोलू नये. माणसाने दुसऱ्याविषयी वाईट बोलू नये. दुसऱ्याची निंदा करू नये. तसेच रागाची किंवा शिवीगाळीची भाषा वापरू नये. सर्वांशी आपुलकीने व सौजन्याने वागावे. अर्थहीन बडबड करू नये.

Page No.
Date

माणसाचे बोलणे संमग्रसपणाचे आणि मुद्देसूद असावे. याला च सम्यकवाचा असे म्हणतात.

सम्यककर्मान्त :-

सम्यककर्मान्त म्हणजे योग्य कार्य करणे होय. मनुष्याने जीवनाच्या मूलभूत तत्वाशी सुसंगत असे वर्तन करणे म्हणजेच पश्चाताप अथवा लाज वाटेल असे काहीही कार्य न करणे. आपली वागणूक सदाचारी असावी. व्याभिचार करु नये त्यांगल्या हेतूसाठी वाईट कार्य करु नये. मनुष्याने आपले कर्तव्य योग्यरितीने जाणिव ठेवून पार पाडावे

सम्यक् आजीविका :-

सम्यकआजीविका म्हणजे योग्य मार्गाने आपली उपजिविका करणे होय. प्रत्येक माणसाला चरितार्थ चालवायचा असतो ते चालविण्याकरिता अनेक मार्ग आहेत. काही चांगले आहेत काहि वाईट आहेत. मनुष्याने आपली उपजिविका योग्य उद्योगधंदा करुनच चालवावी. उपजीविका करतांना वाईट मार्गाचा अवलंब करु नये. आपल्या उपजिविकेच्या साधनामुळे इतरांची हानी होणार नाही याची काळजी घ्यावी.

9/10

Kisan Shikshan Prasarak Mandal Hadolti

KARAMAYOGI TULSHIRAM PAWAR MAHAVIDHYALAYA, HADOLTI

Ta.Ahmedpur Dist. Latur

UNIT TEST 2022-1023

Classs: B.A.F.Y. Semester I Unit Test I Subject PALI

Time 30 Min Mark 10

Name of Paper निवडक गद्य व पद्य Paper No. I

प्र.१ ला सुंसुमार जातककथे विषयी सविस्तर माहिती लिहा.

किंवा

बोधीकथा विषयी सविस्तर माहिती लिहा.

Kisan Shikshan Prasarak Mandal Hadolti

KARAMAYOGI TULSHIRAM PAWAR MAHAVIDHYALAYA, HADOLTI

Ta.Ahmedpur Dist. Latur

UNIT TEST 2022-1023

Classs: B.A.F.Y. Semester I Unit Test I Subject PALI

Time 30 Min Mark 10

Name of Paper निवडक गद्य व पद्य Paper No. I

प्र.१ ला सत्तजटील सुत्ता विषयी माहिती लिहा.

किंवा

पुन्निका थेरी विषयी माहिती लिहा.



Scanned with OKEN Scanner

Subj

कर्मयोगी तुळशिराम पवार महाविद्यालय हडोळती

ता. अहमदपूर जि. लातूर

प्रथम / ... परीक्षा 2022 2023

वि. नाव : गोडे रूपाली ईश्वर

वर्ग B.A.F.Y ह.क्र. ——— दि. ———

विषय पाली पे.क्र. ———

पर्यवेक्षकाची स्वाक्षरी

8/10 Eight

।ला सुंसुमारजातकं कथेविषयी माहिती लिहा ?

"अलमेतेहि अम्बेहीति —...." यह (गाथा) शास्ता ने जेतवन में विकार करते समय देवदत्त द्वारा वध - हेतु किये गये प्रयत्न के बारे में कही।

क वर्तमान कथा

उस समय शास्ता ने यह सुन कि देवदत्त वध के लिए प्रयत्न करता है, कहा - भिक्षुओ, न केवल इस समय मेरा वध करने का प्रयत्न करता है, उसने पहले भी किया है; लेकिन त्रास मात्र भी न उत्पन्न कर सका। इतना कह पूर्व - जन्म की कथा कही।

ख अतीत कथा

पूर्व काल में वाराणसी - नृप ब्रह्मदत्त के राज्य करते समय बोधिसत्व हिमालय प्रदेश में बन्दर योनि प्राप्त की। वह हाथी सदृश बलवाले, शक्ति - सम्पन्न महान शरीरधारी, सुन्दर थे। गंगा के मोड पर जंगल में रहते थे।

उस समय गंगा में एक मगरमच्छ रहता था। उसकी भार्या ने बोधिसत्व को देखा। उसके मन मे उसका मांस खाने का दोहद उत्पन्न हुआ। उसने मगरमच्छ रहता था से कहा - स्वामी। इस कपिराज का हृदय - मांस खाना चाहती हूँ। "भद्रे! हम जल चर, वह स्थल - चर; क्या हम उसे पकड सकेंगे ?" "जिस किसी भी प्रकार हो पकड, यदि नहीं मिलेगा तो मर जाऊँगी।" "तो चिन्ता मत कर। मैं तुम्हे उसका हृदय - मांस खिलाऊगा।"

Scanned with OKEN Scanner

उसे आश्वासन दे मगरमच्छ, जिस समय बोधिसत्व गंगा का पानी पी गंगा - तट पर बैठा है, बोधिसत्व के पास जाकर बोला - बानरराज। यहाँ इन अस्वादिष्ट फलों को खाते हुए तुम अभ्यस्त स्थान में ही विचरते हो? गंगा - पार आम, कटहल के मधुर फलों की सीमा नहीं (अधिकता है) क्या गंगा - पार जाकर फल - मूल खाने नहीं चाहिए? " मगरराज। गंगा में पानी बहुत है। वह विस्तृत है। मैं उधर कैसे जाऊँ " यदि चले तो मैं तुम्हे अपनी पीठ पर चढ़ा कर ले जाऊँगा।" उसने उसका विश्वास कर 'अच्छा' कह स्वीकार किया। 'तो आ मेरी पीठ पर चढ' कहने पर (बानरराज) चढ गया। मगरमच्छ थोडी दूर जा, उसे डुबाने लगा।

बोधिसत्व ने पूछा - मित्र! यह क्या? मुझे पानी में डुबा रहा है? "मैं तुम्हे धर्म - भाव से नहीं ले जा रहा हूँ। मेरी आर्या के मन तुम्हारे हृदय - मांस के लिए दोहद उत्पन्न हुआ है मै उसे तुम्हारा हृदय - मांस खिलाना चाहता हूँ।" दोस्त! तुमने हृदय इस गूलर के पेड पर लटकते है। कह दिया, अच्छा किया। यदि हमारे पेट में हृदय हो तो एक शाखा पर मेरे घूमते हुए चूर्ण - विचूर्ण हो जाय।"

"तो तुम कहाँ रखते हो?" बोधिसत्व ने पास ही पके फलों से लदा हुआ एक गूलर का पेड दिखाकर कहा - देख, हमारे हृदय इस गूलर के पेड पर लटकते है।

" यदि मुझे हृदय दे, तो मै तुम्हे नहीं मारूँगा। " तो आ मुझे वहाँ ले चल। मै तुम्हे वृक्ष पर लटका हुआ हृदय दूँगा।

वह उसे लेकर वहाँ गया। बोधिसत्व ने उसकी पीठ पर से छलाँग मार गूलर की शाखा पर बैठ गया और कहा - सौम्य! मूर्ख मगरमच्छ! तुमने यह मान लिया कि इन प्राणियों का हृदय वृक्ष की शाखाओं पर होता है। तुम मुर्ख हो। मैंने तुमको ठगा है। तुम्हारे फल - मूल तुम्हारे ही पास है। तुम्हारा शरीर ही बड़ा है। बुद्धि नहीं है। यह कह, इसी बात को स्पष्ट करते हुए गाथाएँ कहीं।

8/10 Eight

| | ... (...) | Present | Absent | Result | Percent(%) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |

Kisan Shikshan Prasarak Mandal Hadolti

KARAMAYOGI TULSHIRAM PAWAR MAHAVIDHYALAYA, HADOLTI

Ta.Ahmedpur Dist. Latur

UNIT TEST 2022-1023

Classs: B.A.S .Y. Semester III Unit Test I Subject PALI (OPT)

Time 30 Min Mark 10

Name of Paper मज्झिमनिकाय व खुद्दकपाठ Paper No. V

प्र.१ला सुत्तपिटकाचा परिचय लिहा

किंवा

सब्बासवसुत्त विषयी माहिती लिहा.

Kisan Shikshan Prasarak Mandal Hadolti

KARAMAYOGI TULSHIRAM PAWAR MAHAVIDHYALAYA, HADOLTI

Ta.Ahmedpur Dist. Latur

UNIT TEST 2022-1023

Classs: B.A.S .Y. Semester III Unit Test I Subject PALI (OPT)

Time 30 Min Mark 10

Name of Paper मज्झिमनिकाय व खुद्दकपाठ Paper No. V

प्र.१ला मज्झिमनिकाय विषयी माहिती लिहा

किंवा

तिसरण विषयी माहिती लिहा

Scanned with OKEN Scanner

| ct | Enrolled | Total(fess) | Present | Absent | Result | Percent(%) |
|---|---|---|---|---|---|---|

कर्मयोगी तुळशिराम पवार महाविद्यालय हडोळती
ता. अहमदपूर जि. लातूर
प्रश्न / [illegible] सत्र 2022-2023
वि. नाव : बोधे शान्ती शादिमात
वर्ग B.A.F.Y. ह.क्र. ——— दि. ———
विषय पालि प्र.क्र. ———
पर्यवेक्षकाची स्वाक्षरी

9/10 Mark

1) सुत्तपिटक :-

सुत्तपिटकामध्ये बुद्धकालीन सामाजिक व धार्मिक परिस्थितीवर तसेच समाजातील अनिष्ट चालीरीतिवर प्रकाश बुद्धाच्या प्रवचनांचे संकलन केले गेले आहेत. सुत्त म्हणजे "सुतन्त" - प्रवचन - संवाद असा अर्थ होतो. सुत्तपिटकातील गद्य कथा प्रवचनातून किंवा संवादातून उद्धृत केलेल्या आहेत. बुद्धकाळी अंग, मगध, कोसल, वज्जी, काशी, मल्ल, चेदी, वत्स, कुरू, पांचाळ, मत्स्य, सौरसेन, अश्मक आवंती, गांधार आणि कंबोज इ सोळा राज्यांची सत्ता असलेले "महाजनपदे" राज्ये होती. ज्या राज्यावर राज्यांची आधिसत्ता नव्हती ती राज्ये कपिलवस्तूचे शाक्य, पावा व कुशीनारा येथील मल्ल, वेशालिचे लिच्छवी, मिथिलेचे विदेह, रामग्राम चे कोलीय, आलकप्पे बुली, केसपुत्तचे कलिंग, पिप्पलवनाचे मौर्य, आणि त्यांची राजधानी सिसुमारगिरी होती ते भग्ग - ज्या राज्यावर सत्ता होती त्यांना "जनपद" व ज्यावर सत्ता नव्हती त्या राज्यांना "संघ" किंवा "गणराज्य" म्हणत.

या राज्यात बुद्धांनी सतत ४५ वर्षे पायी प्रवास करून जे ज्ञान, उपदेश, समाजातील सामान्य लोकांना दिले, ज्यांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी अहोरात्र परिश्रम करून, बहुजन कल्याणमय वातावरण निर्माण केले, त्या बुद्धांचे संवादाचे, प्रवचनाचे संकलन यात केलेले आहे. सुत्तपिटकात वाङ्मयीन दृष्ट्या फार श्रेष्ठ दर्जाचे ग्रंथ आहेत. या विस्तृत ज्ञानभंडाराचे, पिटकाचे पाच भागात विभागणी करण्यात आलेली आहे.

1) दिघनिकाय (2) मज्झिम निकाय 3) संयुक्त निकाय
4) अंगुत्तर निकाय 5) खुद्दकनिकाय.

Scanned with OKEN Scanner

Date: / /

अ) दिघनिकाय :-

हा सुतपिटकातील पहिला व मोठ्या भाषणांच्या संकलनाचा ग्रंथ आहे. यात ३४ सुत्त आहेत. प्रत्येक (भाषा समूह) सुत्तात सांप्रदायातील कोणत्यातरी मताचे सुक्ष्म परिक्षणात्मक विवरण आढळते. यात बुद्धाने आपल्या शिष्यांना, आचार विषयक नियम देताना कोणते व्यवसाय करू नयेत हे सांगितले. यावरून त्या काळातील समाज जीवन, धंदे, कला, खेळ, समजुती, यज्ञयाग विषयी विपुल प्रमाणात माहिती मिळते. तसेच (लक्षणशास्त्र, ज्योतिष (शरीरावरील चिन्हांवरून भविष्य सांगणे), शकुन मुहूर्तशास्त्र, स्वप्नशास्त्र, हस्तसामुद्रीक, खुळ्या समजुती, त्या काळातील समाजजीवनात प्रचलित होत्या. त्या नष्ट करण्याचे मानवी मन परिवर्तनाचे, संवेदनात्मक प्रवचनांचे; भाषणाचे प्रस्त मानवी मनावर बिंबवून त्या काळातील अनिष्ट चालीरीत्या नष्ट केल्या.

जातिभेद नष्ट करून समता प्रस्थापित केली. भारतीयांनी त्या काळात गणित, स्थापत्य, राजनिती, वैद्यक, शल्य-क्रिया, या विषयांचे सखोल ज्ञान सोप्या पद्धतीने सांगण्याचे महान कार्य बुद्धाने केले. अशा प्रकारचे परिक्षणात्मक विश्लेषण दिघनिकायातील प्रत्येक सुत्तामध्ये सांगितलेले आहे. दिघनिकायाचे ३४ सुत्तांचे (भागांचे) खालीलप्रमाणे विश्लेषण केलेले आहे.
अ) सीलक्खन्धक वग्ग, आ) महावग्ग,
इ) पाथिकवग्ग. असे वर्गीकरण केले आहे.

ब) मज्झिम निकाय :-

यात १५२ सुत्तांचा समावेश आहे. हे सुत्तपिटकातील दुसरे भाग होय. मज्झिम निकाय म्हणजे मध्यम आकाराच्या प्रवचनांचा संग्रह आहे. सुतपिटकात याला दिघनिकायानंतर जरी अनुक्रम दिला असला तरी या पिटकाच्या सर्व निकायात तो बुद्धवचनाला अगदी जवळचा, अधिक प्रामाणिक आहे, असे राहुल सांकृत्यायन यांनी म्हटले आहे.

मज्झिम निकायातील सुत्तांचे पन्नास एकेक संग्रह असे तीन भाग पाडले आहेत. १) मुलपण्णासक (सुत्ते १ ते ५०) २) मज्झिम पण्णासक (सुत्ते ५१ ते १००), ३) उपरिपण्णासक (सुत्ते १०१ ते १५२)

Shubham

Scanned with OKEN Scanner

दर दहा सुत्तांचा वर्ग व ५ वर्गाचा एक पण्णासक. १५ वग्गात विभाजन केले आहे. ही सर्व ठराविक संख्याची रचना असून ती करण्यात कुठलेही तत्त्व अनुस्युत नाही- मुलपरियाय असुन ते नाव "मुल परियाय" या प्रारंभीच्या सुतावरून घेतले असुन त्या सुतात अनात्मवाद व अनासक्तिवाद या बुद्धाच्या संपूर्ण धर्माच्या प्राथमिक सिद्धांताचा आदेश केला आहे.

२) संयुक्त निकाय :-

हा उपदेशपर बुद्धवचनाचा संग्रह असून, लहान मोठ्या कथा समुहाचे भाग केलेले आहेत, म्हणुन याला संयुक्त निकाय म्हटले आहे. हे सुतपिटकातील तीसरे ग्रंथ असुन प्रत्येकाचा संबंध निरनिराळ्या नावाशी अगर वस्तुशी आहे. त्यात निरनिराळ्या सांप्रदायिक तत्वांचे विवेचन केले आहे. ही सुत्ते एकत्र करतांना तीन गोष्टी लक्षात घेतलेल्या आढळतात. त्या अशा (१) एकाच गुच्छातील सुत्तामध्ये बौद्ध संप्रदायाच्या काही मुख्य तत्वांचे उद्‌घाटन केलेले असते. २) त्यांचा संबंध विशिष्ट वर्गातील देव, दानव अगर मानव यांच्याशी असतो. ३) त्यामध्ये एखादी व्यक्ती विवेचक किंवा नायक असते. या ५६ संयुक्तांचे ५ पक्ष (वर्ग) केलेले आहेत. ही सुत्त मध्यम अथवा दिघनिकायातील सुत्तांपेक्षा बरीच लहान आहेत.

संयुक्त निकायातील सुतांची संख्या एवढी मोठी असण्याचे कारण म्हणजे यात प्रत्येक विषयाच्या सर्व बाजुंच्या एखाद्या ठराविक पद्धतीने विचार केलेला आहे. या निकायाचे पाच भागात विभाजन केलेले आहे. प्रत्येक वर्गाचे संयुक्त संग्रह केले गेले, ते खालीलप्रमाणे - (१) सगाथवग्ग (२) निदानवग्ग, ३) खन्धकवग्ग ४) सळायतनवग्ग, ५) महावग्ग असे संग्रहित करण्यात आले.

३) अंगुत्तर निकाय :-

सुत्तपिटकाचा ४ था भाग असुन मोठा विभाग म्हणजे अंगुत्तर निकाय. यामध्ये २३०८ सुत्ते असुन ती अनुक्रमे १६९ वर्गात व ११ निपातांत विभागली आहेत. वर्ग म्हणजे सुत्त संग्रह, अंगुत्तर निकायातील वर्गात कमीतकमी ७ ते जास्ती

-त आस्त २६२ सुत्ते आहेत. पाहिल्या तीन निपातात विलेल बौद्ध धर्म व तत्वज्ञान यांचे स्वरूप या निकायात मांडले आहे. त्याची मांडणी मात्र संख्यात्मक पद्धतीने केली गेली आहे.

5) खुद्दक निकाय (क्षुद्रक निकाय) :-

हा सुत्त पिटकातील पाचवा व महत्वाचा भाग हा लहान लहान (खुद्दक) स्वतंत्र ग्रंथाच्या संग्रह आहे. असे नावावरून दिसते. परंतु त्यात येणारे जातक वगैरे ग्रंथ लहान नाहित. भाषा शैलीच्या दृष्टिने हा निकाय पूर्वीच्या चार निकायापेक्षा भिन्न आहे. काव्य, आख्यान, गीत इत्यादी विषय यात असुन यातील काही ग्रंथ निव्वळ पद्यात्मक व काही गद्यात्मक आहेत. खुद्दक या निकायातील निरनिराळ्या ग्रंथात विषय आणि शैली या दृष्टिने पुष्कळ विविधता आहे.

खुद्दक निकायातील ग्रंथ :-

1) खुद्दक पाठ :-

हा नऊ लहान लहान पाठांचा संग्रह आहे. 1) सरणत्तय, 2) दससिक्खापद, 3) द्वतिसाकाय, 4) कुमार पन्ह (कुमार प्रश्न), 5) मंगल सुत, 6) रतनसुत, 7) तिरोकुड्डसुत, 8) निधीकंड सुत, 9) मेतसुत इत्यादी लहान पाठाचा समुदाय.

2) धम्मपद :-

"धम्मपद" हा पालि साहित्यातील लोकप्रिय ग्रंथ, ब्रम्हदेश, थायलँड, कंबोडीया, लाओस, चिन इत्यादी देशात प्रत्येक भिक्खुला धम्मपद पाठ येणे आवश्यक मानले जाते. लंकेमध्ये धम्मपदाचे पारायण केल्याखेरीज कोणत्याही भिक्खुची उपसंपदा होत नाही. या ग्रंथाला बौद्धाची गीता म्हणतात. अखिल भारतीय स्वरूपाचा ग्रंथ आहे. हा बौद्धाच्या महत्त्वपूर्ण मौलीक ग्रंथ आहे. यात पद्यात्मक ४२३ गाथा असुन २६ वग्गात समावेश केलेला आहे. यात व्यवहारात्मक दृष्टांत धम्मपदातील निम्याहुन अधिक गाथा, मनोविश्लेषणात्मक, नितीमुल्य दर्शक आहेत. धम्म = पद, धर्म विषयक "शब्द" पद = वाक्य, गाथा = पक्ति "श्लोक" इतक्या अर्थी वापरला जातो.

Shubham

Subject | Enrolled | Total

# कर्मयोगी तुळशिराम पवार महाविद्यालय हडोळती

ता. अहमदपूर जि. लातूर

प्रथम / द्वितीय सत्र परीक्षा २० २०

वि. नाव :

वर्ग ____ ह.क्र. ____ दि. ____

विषय ____ प्र.क्र. ____

पर्यवेक्षकाची स्वाक्षरी

धम्मपदात धर्माचे मार्ग, धम्माची मार्गदर्शिका म्हणून मौलिक स्वरूपाचा ग्रंथ आहे. त्यातील नितीतत्व इतक्या सुंदर दृष्टांतांनी विशद केली आहे की वाचकांचे मन भारून जाते. धम्मपद हे सुभाषित रत्न भांडार आहे.

3) उदान :-
याचा अर्थ उद्गार - उत्स्फूर्त वचन. उदानामध्ये ८ सुत्ते आहेत. 1) बोधिवग्ग, 2) मुचलिन्द, 3) नन्दवग्ग, 4) मेघियवग्ग, 5) शोण स्थविर, 6) जात्यन्ध वग्ग, 7) चुल्लवग्ग, 8) पाटलिग्राम वग्ग आहेत.

4) इतिवुतक :-
हा खुद्दकनिकायातील चौथा ग्रंथ आहे. इतिवुतक बुद्ध असे म्हणाले. परंपरागत समजुतीप्रमाणे खुज्जुतराने कौशाम्बी मध्ये जी बुद्धवचने एकली त्यांचा हा संग्रह आहे.

5) सुत्तनिपात :-
हा खुद्दक निकायातील पाचवा ग्रंथ. धम्मपदाचे खालो खाल अत्यंत महत्त्वाचा लोकप्रिय ग्रंथ. सुत्तनिपातात पाच वर्ग आहेत. 1) उरगवग्ग, 2) चुल्लवग्ग, 3) महावग्ग, 4) अट्ठक वग्ग, 5) पारायण वग्ग, असे पाच आहेत. बौद्ध धर्म हा एक निती मार्ग आहे.

6) विमानवत्थु :-
विमान = देवतांचे प्रासाद, वत्थु = कथा. विमानवत्थुचे ७ विभाग आहे. खुद्दक निकायातील सहावा ग्रंथ आहे.
1) पीठवग्ग - १७, 2) चित्तलता वग्ग - ११, 3) पारिच्छत्तक वग्ग - १०, 4) मञ्जट्ठ वग्ग - १५, 5) महारथ वग्ग - १४, 6) पायासि वग्ग - १०, 7) सुनिक्खित वग्ग - ११ असे वर्गिकरण केले आहे.

Scanned with OKEN Scanner

Page No. :
Date :

7) पेतवत्थु :-
केलेल्या कर्माची फळे भोगल्यावाचून सुटका नाही हसविण्यासाठी अंधश्रद्धात्मक पौराणिक प्रेमकथा संग्रह.

8) थेरगाथा :-
बुद्धकालीन स्थविरांचे कथासंग्रह.

9) थेरीगाथा :-
भिक्खुंनी विषयक कथासंग्रह.

10) जातक :-
खुद्दक निकायातील दहावा ग्रंथ, पुर्नजन्म विषयक कथासंग्रह,

11) निद्देस :- स्पष्टीकरण.

12) पटिसम्भिदामग्ग :-
प्रश्नोत्तर रूपी ग्रंथ,

13) अपदान :-
अपदान म्हणजे पराक्रम, मस्तकृत्य, आत्मत्या
विषयक ग्रंथ.

14) बुद्धवंस :-
२८ परिच्छेदांच्या पद्यात्मक ग्रंथ.

15) चरियापिटक :-
खुद्दक निकायातील शेवटचा ग्रंथ,

Page No. :
Date : / /

अशा प्रकारे खुद्दक निकायातील ग्रंथ समूह आहे. सुत्तपिटकातील प्रामाणिक बुद्धवचनांचे बोधात्मक नितीविषयक मौलिक विचारांचे भांडार आहेत. यात बुद्धवचनांच्या नवांगांचे वर्गीकरण आहे.

सुत्त, गेय्य, वेय्याकरण, गाथा, इतिवुत्तक, उदान, जातक, अब्भुतधम्म आणि वेदल्ल यात प्रामाणिक बुद्धवचनांचे संकलन आहे.

9 nine

INTERAL TEST 2023-2024

Classs: B.A.T.Y. Semester V Unit Test I Subject PALI (OPT)

Time 30 Min Mark 10

Name of Paper विशुद्धीमग्गो Paper No. XI

प्र.१ला आचार्य बुद्धघोष विषयी सविस्तर माहिती लिहा.

किंवा

विशुद्धीमग्गो ग्रंथाचे महत्त्व लिहा.

Kisan Shikshan Prasarak Mandal Hadolti

KARMAYOGI TULSHIRAM PAWAR MAHAVIDHYALAYA, HADOLTI

Ta.Ahmedpur Dist. Latur

INTERAL TEST 2023-2024

Classs: B.A.T.Y. Semester VI Unit Test I Subject PALI (OPT)

Time 30 Min Mark 10

Name of Paper सुत्तनिपात Paper No. X II

प्र.१ला सुत्तनिपात ग्रंथ विषयी माहिती लिहा.

किंवा

कसिभारद्वाज सुत्त विषयी माहिती लिहा.

Scanned with OKEN Scanner

कर्मयोगी तुळशिराम पवार महाविद्यालय हडोळती
ता. अहमदपूर जि. लातूर
प्रथम / द्वितीय सत्र परीक्षा २०२५ २०२४
वि. नाव : Komal Digamber Gunale
वर्ग B.A.F.Y ह.क्र. AAS14575 दि. 23-5-2024
विषय Pali प्र.क्र. 575
पर्यवेक्षकाची स्वा:

9/10

प्र.१ ला बुध्दघोषांच्या अट्ठकथा विषयी माहिती लिहा.

2. आचार्य बुध्दघोष :-
चरित्र :-

पाली अट्ठकथाकारांपैकी सर्वश्रेष्ठ अट्ठकथाकार म्हणून आचार्य बुध्दघोषाला ओळखले जाते. कारण आचार्य बुध्दघोषाने जेवढे बुध्दशासनाची सेवा केली आहे तेवढे कोणत्याही व्यक्तीनी केली नाही. आचार्य बुध्दघोषांच्या जीवनाबद्दल दन्तकथात्मक माहिती चुलवंस बुध्दघोसुप्पत्ति आहेत. गंधवंस, सासनवंस, सध्दम्मसंगह या ग्रंथातून मिळते. पण हे ग्रंथ इतके उत्तरकालीन आहेत की बुध्दघोषानंतर 1000 ते 1500 वर्षांनी लिहिलेल्या ग्रंथातील दंतकथांची विश्वसनीयता संशयीत ठरते. बुध्दघोषाबद्दल सर्वात जुना इतिहास चुलवंस इ.स. शतकाच्या तेराव्या शतकातील धर्मकिर्ती या भिक्षूने महावंस या जुन्या ग्रंथाला चुलवंस ही पुरवणी जोडली आहे. चुलवंस या ग्रंथानुसार बुध्दघोषाचा जन्म बुध्दगयेमध्ये बोधीवृक्षाच्या जवळ राहणाऱ्या एका ब्राम्हण घराण्यात झाला तो लहानपणापासूनच कला व तीन वेदांमध्ये पारंगत होता तसेच तो योगाभ्यासी होता. पूर्वीच्या प्रमाणे तो ब्राम्हणविद्यार्थी यांच्याबरोबर वादविवाद करून भारतभर फिरत असत. त्याला ज्ञानाची खूप मोठी ओढी होती. तो भारतभर फिरताना एका बौध्द विहारात पातंजल योगावर एक प्रवचन दिले. परंतु रेवत नावाच्या बौध्द स्थविरांशी त्याचा वाद होऊन त्यात बुध्दघोषाचा पराभव आला व बौध्दमताच्या सत्येबद्दल त्याला

ज्ञानाची खूप मोठी गोडी होती. तो भारतभर फिरत असताना एका बौध्द विहारात पातंजल योगावर मत [illegible]. पण रेवत नावाच्या एका बौध्द स्थविराशी त्याचा वाद होऊन त्यात बुध्दघोषाचा पराभव झाला व बौध्दमताच्या सत्यतेबद्दल त्याची खात्री पटली. आपली [illegible] प्रव्रज्या घेतली. प्रव्रज्या [illegible] त्याने त्रिपिटकाचे अध्ययन केले. वास्तविकतः तो भिक्षू होण्याआगोदर एक ब्राम्हण विदयार्थी (ब्राम्हमानव) होता. सस्वर वेदपठन करणाऱ्या या ब्राम्हणाने तशाच गंभीर आवाजात पटकाचे पठन करताना ऐकणारे बुध्द भिक्षू इतके मुग्ध झाले की, बुध्दसारख्या गंभीर आवाजात (बुध्दघोष) हा भिक्षू आहे असे वाटून त्यांनी त्याचे बुध्दघोष असे नाव ठेवले.

जेथे बुध्दघोषाने प्रव्रज्या घेतली, त्याच विहारात त्याने ज्ञानोदय (ज्ञानोदय) नावाच्या ग्रंथाची रचना केली. त्यानंतर त्याने धम्मसंगणिवरील अठ्ठसालिनी नावाची अठ्ठकथा लिहिण्यास प्रारंभ केला. हे पाहून त्याचे गुरु रेवत स्थविर म्हणाले की, लंकेतून भारतात फक्त तिपिटकच आणले आहे. अठ्ठकथा नाही लंकाद्विपामध्ये महास्थविर महेन्द्रद्वारा संग्रहित सिंहली भाषे मध्ये ज्या अठ्ठकथा लिहिल्या आहेत त्या लंकेतच आहेत व अठ्ठकथांच्या परंपरा तेथे जतन केल्या गेल्या आहेत. तेव्हा बुध्दघोषाने आपल्या गुरुंची आज्ञा मानुन लंकाधिपती महानाम यांच्या काळामध्ये लंकेला गेला. तेथे गेल्यावर अनुराधपूर येथील महाविहारात राहिला व त्याने संघपाल नामक स्थविराकडून सिंहली अठ्ठकथा व परंपरागत स्थविरवाद यांचे श्रवण केले. त्याने त्या महाविहारातील भिक्षुसंघाला त्यांच्या ग्रंथालयातील सिंहली अठ्ठकथांचे मागधी (पालि) मध्ये अनुवाद करण्यासाठी परवानगी मागीतली.

तेव्हा बुध्दघोषाच्या ज्ञानाची परिक्षा घेण्यासाठी तेथील भिक्षुंनी संयुक्त निकायातील दोन गाथा दिल्या. पुढे चालुन त्या गाथेवरूनच आचार्य बुध्दघोषाने विसुध्दिमग्ग या ग्रंथाची रचना केली. तेव्हा विसुध्दिमग्गाची विद्वता पाहुन इतके आश्चर्यचकीत झाले की, बुध्दघोष हा भावी मैत्रेय बुध्दच आहे असे वाटून तेथील

भिक्षुनी त्याला आपले ग्रंथ भांडार खुले केले. अनुराधापूर येथील ग्रंथकार विहारात बसून बुध्दघोषाने सिंहली अट्ठकथांचे मागधी (पाली) मध्ये भाषांतर करण्याचे काम पूर्ण करून तो भारतात परतला आणि बोधिवृक्षाची पुजा करू लागला. या वर्णनावरून एक महत्वाची गोष्ट लक्षात येते की, बुध्दघोष महास्थविर लंकेचा राजा महानाम यांच्या कालावधीत तिथं होते. तेथे राजा महानाम चौथ्या, पाचव्या शतकामध्ये लंकेत शासन करीत होता. धर्मी परंपरेनुसारही आचार्य बुध्दघोष पाचव्या शतकात लंकाव्दिपामध्ये होते असे मानतात. यावरून असे लक्षात येते की, त्यावेळी आचार्य बुध्दघोष तरूण अवस्थेत होता असे दिसते. शेवटी बुध्दघोषाचे देहावसान कोठे झाले याबद्दल निश्चीत माहिती नाही, पण बुध्दघोषाचे निर्वाण कंबोज (कंपुचिया) मध्ये झाले अशी येथील जनतेची श्रध्दा आहे. कारण आजही तिथे बुध्दघोष विहार एक अत्यंत प्राचीन विहार प्रसिध्द आहे.

2. ग्रंथसंपदा -

1. विसुध्दिमग्ग - संयुक्त निकायातील दोन गाथेवरून एक मौलिक ग्रंथ बनविला आहे.
2. समन्तपासादिका - विनयपिटकाची अट्ठकथा
3. कंखावितरणी - पातिमोक्खाची अट्ठकथा
4. सुमंगलविलासिनी - दीघनिकायाची अट्ठकथा
5. पञ्चसुदनी - मज्झीमनिकायाची अट्ठकथा
6. सारत्थप्पकासिनी - संयुक्त निकायाची अट्ठकथा
7. मनोरथपुरणी - अंगुत्तर निकायाची अट्ठकथा
8. परमत्थजोतिका - खुद्दकनिकायातील खुद्दकपाठ व सुत्तनिपाताची अट्ठकथा
9. अट्ठसालिनी - धम्मसंगणीची अट्ठकथा
10. सम्मोह विनोदिनी - विभंगाची अट्ठकथा
11. पञ्चपकरणट्ठकथा - धम्मसंगणी आणि विभंग सोडून इतर पाच अभिधम्मग्रंथाची अट्ठकथा
12. जातकट्ठवण्णना - जातकाची अट्ठकथा
13. धम्मपदट्ठकथा - धम्मपदाची अट्ठकथा
14. इतर ग्रंथ - ज्ञानोदय इत्यादी.

Scanned with OKEN Scanner

Kisan Shikshan Prasarak Mandal Hadolti

KARMAYOGI TULSHIRAM PAWAR MAHAVIDHYALAYA,HADOLTI

Tq.Ahmedpur Dist.Latur

INTERNAL EXAM: 2024-2025

Class:-B.A.F.Y Semester --I---- Unit Test -I--- Subject---PALI (S.L) (NEP)

Time:---1-------

Mark:--10-----

Name of the Paper:---निवडक गद्य व पद्य---Paper No:--I-----

प्र.१ला. सुसुमारजातक कथा विषयी सविस्तर माहिती लिहा.

किंवा

पराभवसुत्ताचा सारांश लिहा.

Scanned with OKEN Scanner

| 34 | 13 | | |
|---|---|---|---|
| 50 | | 22 | 91.66 |

कर्मयोगी तुळशिराम पवार महाविद्यालय हडोळती

ता. जि. लातूर

विषय : देवाने शामल मोतीराम 2025 2026

वर्ग B.A.F.Y. (?) AW20848 दि. —

विषय पाली (S.L) प.क. —

पर्यवेक्षकाची स्वाक्षरी

प्र.१ला) सुसुमारजातकाचा सारांश लिहा

प्रस्तावना -

त्रिपिटकांतर्गत येणाऱ्या सुत्तपिटकाच्या 5 निकायापैकी 5 क्रमांकाच्या खुद्दक निकायाच्या 15 ग्रंथापैकी 10 क्रमांकाच्या जातकअट्ठकथा या ग्रंथातून सुसुमारजातक हा पाठ घेतला आहे.

तथागत बुद्धांनी या हि पारमिको कथा पद्य चिकित्सा करा आणि स्वीकारा असा उपदेश दिला आहे. एखाद्यावर विश्वास ठेवण्यापूर्वी चिकित्सा करा अन्यथा पश्चताप सहन करावा लागतो हे सदरील पाठातून वर्णिलेले आहे.

भाषांतर -

प्राचीन काळी वाराणसीमध्ये ब्रह्मदत्त नावाचा राजा राज्य करीत असताना बोधिसत्वाने हिमालय प्रदेशात वानरच्या जातीत जन्म घेऊन हत्तीसारख्या सामर्थ्यवान, बलवान, सुदृढ व सुडोल होऊन तो गंगेच्या काठावरील अरण्यात राहत होता. तेव्हा एक मगर

मगर त्या गंगेमध्ये राहत असताना त्याच्या पत्नीने बोधीसत्वाचे शरीर पाहून वानराचे काळीज खाण्याचे डोहाळे लागले आणि मगराला म्हणाली की, "स्वामी या वानराचे काळीज खाण्याचे डोहाळे लागले." तो "प्रिय, आपण जलचर आहोत आणि तो स्थलचर आहे त्याला पकडणे मला कसं बर शक्य होईल?"

स्वामी! त्याला कसेही करून पकडून आणा! तो जर मला मिळाला नाही तर मी मरून जाईल. प्रिये! यावरून नकोस कोणताही उपाय करून वानराचे काळीज मी तुला आणून देईन. (असे त्याने आपल्या पत्नीला आश्वासन दिले.) बोधीसत्व गंगेच्या काठावर बसून पाणी पीत असताना मगराने त्यास पाहिले व तो वानराजवळ जाऊन असे म्हणाला की, वानरेन्द्र ह्या प्रदेशातील फळे स्वादिष्ट नाहीत परंतु गंगेच्या पैलतीरावर जाऊन मधुर गोड फळ खावी असे तुला वाटत नाही काय?

बोधीसत्व मगराला म्हणाले, गंगेचे पात्र फारच विशाल व पाणीही विपुल आहे. त्यामुळे मी दुसऱ्या किनाऱ्यावर कसा जाऊ शकेन? मित्रा! जायचे असेल तर तू माझ्या पाठीवर बस मी तुला तिकडे घेऊन जाईन. बोधीसत्वाने त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून, त्याचे म्हणणे ऐकले. त्याच्या पाठीवर बसल

तो गोलेत्या सवांहातून जाऊ लागला, मध्यभागी येताच मगर पाण्यात बुडू लागली. तेव्हा वानराने विचारले की, मित्रा मगरा! तू मला पाण्यात का बुडवीत आहेस? तू असे कशाकरिता करीत आहेस? तो म्हणाला की, अरे मी तुला काही कोठे गोलेत्या पाद्यातून घेऊन जात नाही. माझ्या पत्नीला तुझ्या हृदयाचे काळीज खाण्याचे डोहाळे लागल्याने मी तुला तुझ्या हृदयाचे काळीज खाण्याकरिता घेऊन जात आहे.

मित्रा! बरे झाले तू हे मला येथेच सांगितलेस. अरे मित्रा! आमच्या पोटात खरोखर काळीज असते तर एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उड्या मारताना त्याचे तुकडे झाले नसते काय? मगर म्हणाले कि, अरे मित्रा! मग तुम्ही आपले काळीज कुठे ठेवता? तेव्हा बोधीसत्वाने काही अंतरावरील एक पिकलेल्या फळांनी वाकलेल्या उंबराच्या झाडाकडे बोट दाखवून म्हटले की, पहा माझे काळीज त्या उंबरच्या झाडावर लोंबत आहे. मित्रा! तू जर मला खरेच हृदयाचे काळीज आणून देशील, तर मी तुला मारणार नाही तर चल मला तेथे नेऊन सोड. म्हणजे मी त्या उंबराच्या झाडावरील माझे काळीज आणून तुझ्या स्वाधीन करीन. यावर, विश्वास ठेवून मगराने वानराला झाडाजवळ सोडले.

बोधीसत्वाने त्याच्या पाठीवरुन उडी घेऊ उंबराच्या झाडाच्या फांदीवर बसून म्हटले की, अरे मूर्खा मगरा मित्रा वानराचे काळीज त्याच्या फांदीवर असते या विश्वासातून तू मला येथे आणून सोडलेस. मूर्खा! तुझे गोड फळे तुलाच राहू दे तुझे शरीर दिसण्यास विशाल आहे परंतु तुला ज्ञान काहीच नाही असे म्हणून त्याने खालील गाथा म्हटली -

1] हे त्या गंगेच्या पैलतीरावरील उंबे, फणस, जांभूळ व गोड मधुर फळे मला नकोत आहेत. मला माझे उंबरच चांगले आहे.

2] तुझे शरीर विशाल आहे परंतु प्रज्ञा त्यासारखी नाही. मगरा तू माझ्याद्वारे फसला गेला आहेस आता तू सुखपूर्वक जा.

मगर पराजीत झाल्याने अत्यंत दुःखी मनाने आपल्या निवासस्थानी निघून गेला.

सारांश -

सदरील जातकातून आपणास तथागत बुद्धांच्या "या पहा चिकित्सा करा" उपदेशाचे महत्व जीवन जगताना कोणत्याही गोष्टीचा स्वीकार किंवा एखाद्यावर विश्वास ठेवण्यापूर्वी चिकित्सा केली पाहिजे अन्यथा पश्चाताप सहन करावा लागतो असा महत्वपूर्ण उपदेश मिळतो अशा प्रकारे पाली साहित्यात सुसुमारजातका विषयीची माहिती आपणास मिळते.

कर्मयोगी तुळशिराम पवार महाविद्यालय हडोळती

ता. अहमदपूर जि. लातूर

प्रथम / द्वितीय सत्र परीक्षा २०२५ २०२५

वि. नाव : ~~गोणे ऋतुजा ईश्वर~~

वर्ग B.A.f.y ह.क्र. ______ दि. ______

विषय पाली SL प्र.क्र. ______

पर्यवेक्षकाची स्वाक्षरी

9/10

पराभवसुत्ताचा सारांश लिहा.

1. प्रस्तावना :

त्रिपिटकांतर्गत येणाऱ्या सुत्तपिटकाच्या 05 निकायापैकी खुद्दनिकायाच्या 15 ग्रंथांपैकी 05 क्रमांकाच्या सुत्तनिपात या ग्रंथातून पराभवसुत्त ही कविता घेतली आहे.

सदरील कवितेतून व्यक्तीच्या पराभवाची एकूण बारा कारणे तथागत बुद्धांनी सांगितले आहेत.

2. भाषांतर :-

मी असे ऐकले की एकदा तथागत बुद्ध श्रावस्तीमध्ये अनाथपिंडिकाच्या जेतवनात विहारात विहार करीत होते तेव्हा कोणत्यातरी मानवतेने देवतेने रात्र संपताच आपल्या दैदिप्यमान प्रकाशाने संपूर्ण जेतवनाला प्रकाशित करून जिकडे तथागत बुद्ध होते तिकडे जाऊन तथागत बुद्धाला अभिवादन करून एका बाजूला उभे राहिले. एका बाजूला उभ्या असलेल्या मानवतेने तथागत बुद्धांनी गाथेद्वारे असे म्हटले की -

1. मी गौतमास पराभवाकडे जाणाऱ्या पुरुषाविषयी विचारतो. हेच विचारण्यासाठी आम्ही तथागत बुद्धाकडे आलो आहोत. पराभवाचे मुख्य कारण कोणते आहे

ते तथागतांनी सांगावे ?

2. उन्नतीच्या मार्गावर आरूढ झालेल्या पुरुष सहजपणे जाणता येतो. तसेच पराभवाच्या मार्गावर आरूढ झालेल्या पुरुष सुद्धा सहजपणे जाणता येतो धम्म मार्गावर आरूढ झालेल्या पुरुषाची उन्नती होते, तर धम्माच्या द्वेष करणाऱ्या पुरुषाचा पराभव होतो.

3. अशाप्रकारे पराभवाचे पहिले कारण आम्हांला समजले आहे. तथागत बुद्धांनी पराभवाचे दुसरे मुख्य कारण कोणते ते सांगावे ?

4. ज्याला दुर्जन प्रिय असतात, सज्जनां विषयी प्रेम नसते. असत्पुरुषाच्या धर्मात पसंत करतात हे त्याच्या पराभवाचे मुख्य कारण आहे.

5. अशा प्रकारे पराभवाचे दुसरे कारण आम्हांला समजले आहे. तथागत बुद्धांनी पराभवाचे तिसरे मुख्य कारण कोणते आहे ते सांगावे ?

6. जी व्यक्ती निद्रावश प्रिय, सभाप्रिय असणारी, परिश्रम न करणारी आणि क्रोधी आहे हेच त्याच्या पराभवाचे मुख्य कारण आहे.

7. अशाप्रकारे पराभवाचे तिसरे कारण आम्हांला समजले आहे. तथागत बुद्धांनी पराभवाचे चौथे मुख्य कारण कोणते आहे ते सांगावे ?

8. जो समर्थ असून सुद्धा जो आपल्या वृद्धा असलेल्या आई - वडिलांचे पालन पोषण करीत नाही हे त्याच्या पराभवाचे मुख्य कारण आहे.

9. अशाप्रकारे पराभवाचे चौथे कारण समजले आहे. तथागत बुद्धांनी पराभवाचे पाचवे मुख्य कारण कोणते आहे ते सांगावे ?

10. जो श्रमणाला, श्रेष्ठ व्यक्तीला, किंवा अन्य व्यक्तीला अथवा एखाद्या याचकाला खोटे बोलून टाकतो हे त्याच्या पराभवाचे मुख्य कारण आहे.

11. अशाप्रकारे पराभवाचे पाचवे कारण आम्हाला समजले आहे तथागत बुद्धांनी पराभवाचे सहावे मुख्य कारण कोणते आहे ते सांगावे ?

12. जो श्रीमंत सोन्याचांदीने आणि भोजनादी इत्यादीने संपन्न असतो जेव्हा तो स्वादिष्ट भोजन एकटाच करतो हे त्याच्या पराभवाचे मुख्य कारण आहे.

13. अशा प्रकारे पराभवाचे सहावे कारण आम्हाला समजले आहे तथागत बुद्धांनी पराभवाचे सातवे मुख्य कारण कोणते आहे ते सांगावे ?

14. जो मनुष्य आपली जात, धर्म व गोत्र यावर गर्व करतो, जो आपल्या स्वतःच्या आप्ताचा सुद्धा जातीच्या कारणामुळे अनादर करतो हे त्याच्या पराभवाचे मुख्य कारण आहे.

15. अशा प्रकारे पराभवाचे सातवे कारण आम्हाला समजले आहे तथागत बुद्धांनी पराभवाचे आठवे मुख्य कारण कोणते आहे ते सांगावे ?

16. जो व्यक्ती स्त्री व्यसनी दारुडा बेवडा आणि जुगारी आहे कमावलेले धन नष्ट करणारा आहे हे त्याच्या पराभवाचे मुख्य कारण आहे.

17. अशा प्रकारे पराभवाचे आठवे कारण आम्हाला समजले आहे तथागत बुद्धाने पराभवाचे नवे मुख्य कारण कोणते आहे ते सांगावे ?

18. जी व्यक्ती आपल्या पत्नीसोबत असंतुष्ट राहतो वेश्यागमन आणि परस्त्रीच्या सोबत दिसतो हे त्याच्या पराभवाचे मुख्य कारण आहे.

19. अशा प्रकारे पराभवाचे नववे कारण आम्हाला समजले आहे तथागत बुद्धांनी पराभवाचे दहावे मुख्य कारण कोणते ते सांगावे ?

20. जेव्हा वृद्ध व्यक्ती तरुणीशी लग्न करून आणतो तिच्या उपभोगाच्या कारणामुळे झोपू शकत नाही.